आर.**सी.सी.क्र.२६५/२०२२**

**नि.क्र.**

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.१ यांचा पुरावा**.

मी याद्वारे शपथपूर्वक निवेदन करतो की,

माझे नांव –बाळासाहेब भिवसेन काटकर,
वय - ५१ वर्षे , व्यवसाय - मजुरी ,
राहणार – पैठणरोड, शेवगाव ,ता. शेवगाव जि.अहमदनगर

सरतपासणी सहा. सरकारी वकील **श्री.एस.एस.दराडे यांचेमार्फतः**–

१. दि. ०६.०९.२०२२ रोजी मला पोलीसांनी शेवगाव पोलिस स्टेशन येथे पंचनाम्यकामी बोलावले होते. माझ्या समक्ष जप्ती पंचनामा झालेला नाही. माझ्या समोर कोणतेही वाहन पोलिसांनी जप्त केलेले नाही. मी पंचनाम्यावर फक्त सही केली होती. आता मला पंचनामा दाखवण्यात आला. त्यावर अनुक्रम नं.२ वर माझी सही आहे. पंचनामा मी वाचुन पाहिला नव्हता. त्यात काय मजकुर आहे याविषयी मला माहिती नाही.

*(साक्षीदार अभियोगपक्षास सहकार्य करत नसल्यामुळे सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी साक्षीदारास उत्तरसूचक प्रश्न विचारण्यसाची परवानगी मागितली. परवानगी मंजूर करण्यात आली).*

२. हे म्हणणे खरे नाही की, ०६.०९.२०२२ रोजी मला शेवगाव पोलिस स्टेशनमध्ये पंचनाम्याकामी बोलाविले होते. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी पोलिसांनी मला सांगितले की, आम्ही एक इसमास मोटारसायकलसह अटक करुन आणलेली आहे, त्याचा पंचनामा करायचा आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्या इसमाने त्याचे नाव धर्मराज बाबुराव राव असे सांगितले. हे म्हणणे खरे नाही की, सदर आरोपीने त्याने बाजारतळावरून त्याची मोटारसायकल चोरल्याचे सांगितले. हे म्हणणे खरे नाही की, सदरची मोटारसायकल पोलिसांनी माझ्यासमक्ष जप्त केली. हे म्हणणे खरे नाही की, जप्त मोटारसायकलचा नोंदणी क्र. एम एच १६ ए आर २६९५ असा होता. हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांनी माझ्या समक्ष जप्ती पंचनामा केला, तो मला वाचून दाखविला. हे म्हणणे खरे नाही की, जप्ती पंचनामा वाचून पाहिल्यावर मी त्यावर सही केली. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीला वाचवण्यासाठी आजरोजी मी न्यायालयात खोटी साक्ष देत आहे.

आरोपीतर्फे वकील श्री. एल. एच. लांडे यांनी उलटतपास नाकारला.

श्रवणोत्तर स्वीकृति

दिनांक-०१.०८.२०२४

(मोनाली अ.बेंद्रे)
२रे प्रथमवर्ग न्यायदंडाधीकारी,
शेवगाव